रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

## अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत

## मराठी विभाग, ग्रंथालय विभाग, माणदेशी तरंग वाहिनी आणि महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष(IQAC) यांचे संयुक्त विद्यमाने

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने विशेष व्याख्यान

---

**अहवाल** दिनांक-०१/०८/२०२४

महाविद्यालयातील मराठी विभाग, ग्रंथालय विभाग, व महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ ऑगस्ट २०२४ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे व व्याखाते म्हणून मुधोजी महाविद्यालय फलटणचे मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. प्रभाकर पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व जीवन कार्य यांचा परिचय करून दिला.तसेच ते पुढे म्हणाले , 'अण्णाभाऊ साठे यांनी फक्त दीड दिवस शाळेत जाऊन ही ३५ कादंबऱ्या व १७ कथा संग्रह व लावण्या, नाटके लिहून आपले नाव मराठी साहित्य विश्वात अजरामर केले आहे'. 'एक समाज सुधारक म्हणूनही अण्णाभाऊ साठे यांनी मोठी कामगिरी बजावलेली असल्याचे सांगून अण्णाभाऊ साठे यांच्या मनातील देशप्रेम, देशभक्ती ही त्यांच्या साहित्यामधून दिसत असल्याचे सांगितले. दलित साहित्य क्षेत्रामध्ये अण्णाभाऊ साठे यांनी मोलाची भर घातली आहेत. आजही अनेक अभ्यासक आणि विद्यार्थी यांच्या साहित्याकडे आकर्षित होतात. आपणही अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन करावे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल दडस यांनीही विद्यार्थ्यांच्या मध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ.मीरा देठे यांनी केले. तर ह्या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी विभागातील प्रा. डॉ. अनुसया इमडे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण भोसले यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील डॉ. विजय गायकवाड, प्रोफेसर डॉ. काळेल, प्रा.कट्टे ए.पी. ग्रंथपाल प्रा.विष्णू वाघेरे, प्रा. प्रकाश जमदाडे व कला शाखेतील सर्व सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.




ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा.

DAHIWADI COLLEGE, DAHIWADI
LIBRARY
TAL. MAN, DIST. SATARA

प्राचार्य
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा